ड FORM-1 A

N.C.R.B.
I.I.F.-1

# पहिली खबर
# FIRST INFORMATION REPORT

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम 154 अन्वये (Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य State: महाराष्ट्र, जिल्हा District: बृहन्मुंबई, पोलीस ठाणे Police Station: ला.प्र.वि. मुंबई, पहिली खबर क्र. FIR No.: 1, वर्ष Year: 2023, दिनांक Date: 03/01/2023

2. (i) अधिनियम Act: भ्रष्टाचार प्रतिबंध अधि. 1988, कलमे Sections: 7
   (ii) अधिनियम Act ........, कलमे Sections —
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ........

3. (a) अपराधाची घटना: Occurrence of offence: वार Day: शुक्रवार, तारीख पासून Date from: 23/12/2022, Time: 15:53, तारीख पर्यंत Date to: 03/01/2023, वेळ Time: 14:18

   वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा. Tick applicable portion)

   (1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
   (6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (10) 18.00 ते 06.00

   (b) पो. ठा. ला माहिती मिळालेचा Information received at P.S. तारीख Date: 23/12/2022, वेळ Time: 11:00 वा.

   (c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference: Entry No.: 42/2023, तारीख Date: 03/01/2023, वेळ Time: 23.55

4. माहितीचा प्रकार Type of Information: लाचेसंदर्भात, लेखी / तोंडी Written / Oral: लेखी

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण Place of Occurrence: (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा Direction and distance from P.S.: 9 किमी उत्तरेस, चौकी / बीट / दुरक्षेत्र नाव व क्र. Chouki/Beat/O.P. Name and No. ........

   (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name, ठिकाणाचे नंबर No. if any, गल्ली Ward, रस्त्याचे नाव Name of road: कार्यकारी अभियंता (पश्चिम), मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ, रुम नं. 537, चौथा मजला, म्हाडा कार्यालय, बांद्रा (पु) मुंबई-51
   जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable Place, गाव Village, पोस्ट Post, तालुका Taluka, जिल्हा Distt., राज्य State

   (c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो. स्टे. चे नाव In case, outside the limit of this Police Station ........, तालुका Taluka ........, जिल्हा Distt. ........, राज्य State ........

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant: Permanent Address.

   (a) नाव Name: मो. इब्राहिम खत्री (b) वडीलाचे / पतीचे नाव Father's /Husband's Name: रफीक खत्री.

   (c) जन्म तारीख व वय Date of Birth & Age: 23 वर्षे (d) राष्ट्रीयत्व Nationality: भारतीय, फोन नं. Phone No.: 7977944738

   (e) पारपत्र क्रमांक Passport No.: आधार 876317418751, दिल्याचा दिनांक Date of Issue ........, दिल्याचे ठिकाण Place of Issue ........ (f) व्यवसाय Occupation: कॉन्ट्रॅक्टर

   (g) धर्म Religion: मुस्लिम, जात Caste ........, जनजात Sub-Caste ........

   (h) पत्ता Address: गल्ली / सर्वे नं. Ward, घर / नाव नंबर House/Name No., फोन /मो. नंबर Phone/M. No., पॅन नं. Pan No., वोटर्स नं. Card No.
   रुम नं. 03, अब्दुल गणी चाळ, मिलन सब वे रोड, मिलन सोशल ग्रुप, शास्त्रीनगर रस्ता, सांताक्रुझ (पश्चिम) मुंबई-54
   रस्त्याचे नाव Road, जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place, गाव Village, पोस्ट Post, पो. स्टे. P. Stn.
   तालुका Taluka, जिल्हा Distt., राज्य State, सध्याचा पत्ता Present Address

7. माहिती असलेल्या आरोपींचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयीताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासीक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)

   Details Name & Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)

आरोपी लोकसेवक :- आशिष प्रकाश भुरे, हि/40 वर्षे, धंदा :- नोकरी (उप अभियंता), कार्यकारी अभियंता (पश्चिम), मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ, म्हाडा कार्यालय, बांद्रा (पूर्व) मुंबई-51
रा.ठी. रुम नं. बी/604, क्वीन्स, साईड पार्क, कोलशेत रोड, ठाणे (प)

Scanned with OKEN Scanner

जबाब                    दिनांक 03/01/2023

यातील फिर्यादी मो. इब्राहीम रफिक खत्री, राहणार : वॉ.क्र. 6 प्रमाणे यांचा नमूद गुन्ह्याचा प्रथम खबरी जबाब हा स्वतंत्रपणे मराठीत संगणीकृत केला आहे. तोच जबाब नमूद गुन्ह्याचा प्रथम खबरी जबाब संबोधण्यात आलेला आहे.

समक्ष

03/01/2023

(अमोल शिंदे)
पोलिस निरीक्षक
त्या.प्र. पि. [illegible].

जबाब दिनांक ०३/०१/२०२३

श्री मोहम्मद इब्राहीम रफीक खत्री, वय २३ वर्षे, धंदा– कॉन्ट्रक्टर, रा.ठि. रूम नं–०३, अब्दुलगणी चाळ, मिलन सब वे रोड, गारोडिया इस्टेट, मिलन मॉल जवळ, सांताक्रुझ (पश्चिम) मुंबई–४०००५४. मो.क्र. ७९७७९४९७३८, आधार कार्ड क्र. ८७६३१७४१८७५१

---

मी वर नमुद प्रमाणे असुन वरील पत्यावर माझे जन्मापासुन राहत आहे. माझे कुटूंबात माझे वडील नामे रफिक वय ४५ वर्षे, आई नामे रेहमत वय ४२ वर्षे, पत्नी नामे सबा वय २२ वर्षे व मुलगा नामे रूहान वय २ वर्षे असे राहतात. माझा मेसर्स मॉर्डन इंटरप्रायजेस या नावाने कंस्ट्रक्शन कंत्राटदाराचा व्यवसाय असुन मला म्हाडा कार्यालयाकडून म्हाडा अतंर्गत असलेल्या झोपडपट्टीमधील छोटया मोठया दुरूस्तीची कामे, लादी बसविणे, प्लास्टर करणे, गटार पाईप लाईन टाकणे इ कामे करण्याचा परवाना प्राप्त केला. मी म्हाडा अंतर्गत येणाऱ्या झोपडपट्टी अंतर्गत वर नमुद प्रमाणे कामे करायचो व सदर कामाचे बील हे मंजुरीकरीता म्हाडा कार्यालय, बांद्रा, मुंबई येथे सादर करीत होतो. सदर कामाचे बील मला मंजुर व्हायचे व मी केलेल्या कामाची रक्कम मला मिळत असे व त्यातुन मिळणाऱ्या उत्पन्नावर मी माझे कुटूंबाचा उदरनिर्वाह करीत आहे.

मला ओकांर मजुर सहकारी संस्था मर्या अंतर्गत अब्दुलवाला मेंशन– कुर्ला पश्चिम, गंगोत्री मजुर सहकारी संस्था मर्या अंतर्गत वाकोला सांताक्रुझ, आणि गजानन मजुर सहकारी संस्था मर्या अंतर्गत टाटा कॉलनी रोड, भारत नगर येथील लादी बसवणे, गटार पाईपलाईन टाकणे इ छोटया मोठया दुरूस्तीची कामे मिळाली होती. सदर कामाच्या कामाच्या निवीदा हया खासदार निधीमधुन वर नमुद मजुर सहकारी संस्थेस मिळालेल्या असुन सदरची कामे मला डिसेंबर २०२२ मध्ये मिळालेली असुन मी सदरची कामे ही सदर महिन्यातच पुर्ण केली आहेत.

वर नमुदची कामे मी केली असुन त्याचा अंदाजे खर्च हा ३७,५२,४३४/– रू आला असुन तो मी केला आहे. मी वर नमुद केलेल्या कामाच्या बिलाची रक्कम मंजुरी बाबतची कागदपत्रे म्हाडा कार्यालय, बांद्रा येथे डिसेंबर २०२२ मध्येच जमा केली होती. सदर प्रलंबित बिलाच्या मंजूरीबाबत मी म्हाडा कार्यालय, बांद्रा येथील लोकसेवक श्री. आशिष भुरे, डेप्युटी इंजिनिअर यांना दिनांक १९/१२/२०२२ ते २१/१२/२०२२ या कालावधीत प्रत्यक्ष भेटलो व त्यांना मी संबंधित जमा केलेल्या व थकित असलेल्या मंजूर बिलाबाबत विचारणा केली असता लोकसेवक श्री. आशिष भुरे, डेप्युटी इंजिनिअर यांनी माझ्याकडे सदरचे बिल मंजूर करण्याकरिता रूपये २,००,०००/– इतक्या लाचेच्या रक्कमेची मागणी केली.

मला आशिष प्रकाश भुरे, डेप्युटी इंजिनिअर यांना रू. २,००,०००/– लाचेची रक्कम देण्याची इच्छा नसल्याने मी दि. २३/१२/२०२२ रोजी ला.प्र.वि मुंबई विभाग, वरळी, येथे प्रत्यक्ष तक्रार देण्यास आलो. त्यावेळी मला ला.प्र.वि. मुंबई विभागाचे वरिष्ठ अधिकाऱ्यांसमक्ष हजर केले व वरिष्ठांनी माझी तक्रार ऐकूण घेवून माझे तक्रारीवर पुढील कारवाई करण्याकरीता लाप्रवि, मुंबई विभागाचे पोलीस निरीक्षक अमोल शिंदे व सहायक पोलीस आयुक्त शिवराज म्हेत्रे यांची नेमणुक केली. शिंदे साहेब यांनी मला स्वत:ची आणि त्यानंतर शिवराज म्हेत्रे साहेबांची ओळख करून दिली. त्यानंतर अमोल शिंदे साहेब यांनी माझे हस्ताक्षरात इंग्रजीमधुन लेखी तक्रार लिहून घेतली.

मला पोलीस निरीक्षक अमोल शिंदे यांनी मी केलेल्या तक्रारीची दोन शासकीय पंचासमक्ष आशिष प्रकाश भुरे, डेप्युटी इंजिनिअर यांच्या म्हाडा कार्यालयात जावुन पंचासमक्ष पडताळणी करणार असल्याचे सांगितले तसेच पोलीस निरीक्षक अमोल शिंदे यांनी तेथेच हजर असलेले दोन शासकीय पंचाची ओळख मला करून दिली. त्यांची नावे श्री संभाजी पठाडे आणि श्री विवेक आंधळे अशी मला शिंदे साहेबांनी सांगितले. त्यानंतर शिंदे साहेब यांनी माझे तक्रारीची पंचाना माहिती देवुन पंचाना मी इंग्रजीमधुन लेखी दिलेली तक्रार वाचावयास देण्यात आली.

त्यानंतर पो.नि. शिंदे यांनी मला व दोन्ही पंचाना ला.प्र.वि. मुंबई कार्यालयाच्या पहिल्या मजल्यावरील एका रूम मध्ये घेवून गेले. तेथे असलेले श्री मठपती यांचेबरोबर माझी ओळख करून दिली. तेथे पो.नि. शिंदे यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर आणून त्यामध्ये नवीन सेल व मायक्रो एसडी कार्ड टाकून त्यामध्ये पुर्वीचे रेकॉडींग नसल्याचे वाजवून दाखविले. व त्यानंतर पो.नि. शिंदे यांनी स्वत:चे, माझे व दोन्ही पंचांचे वक्तव्य रेकॉर्ड केले. आणि सदर व्हॉईस रेकॉर्डर पोनि शिंदे यांनी त्यांच्या ताब्यात ठेवला

Scanned with OKEN Scanner

त्यानंतर माझे सोबत पंच श्री. संभाजी पठाडे यांना लोकसेवक श्री. भुरे यांचे उप अभियंता, झोपडपट्टी सुधार मंडळ यांचे कार्यालय, म्हाडा बांद्रा (पुर्व) येथील कार्यालयात पाठवून मी केलेल्या तक्रारीची पडताळणी करण्याचे ठरविले. त्यानंतर स.पो.आ. म्हेत्रे व पो.नि. अमोल शिंदे यांनी मला पडताळणी कारवाई बाबतच्या योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर पो.नि. अमोल शिंदे यांनी मला तसेच पंचाना व पडताळणी पथकाला लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालयातील तळमजल्यावरील कक्षात बोलावून तेथे पडताळणी पथकातील अंमलदार यांच्याशी ओळख करून दिली. त्यानंतर आम्ही ला.प्र.वि. मुंबई कार्यालयाच्या आवारात उभ्या असलेल्या शासकीय वाहनाजवळ गेलो. पो.नि. शिंदे यांनी सदर वाहनाचे चालक श्री. मोकल यांची माझेशी ओळख करून दिली.

त्यांनतर मी, दोन्ही पंच, पो.नि. शिंदे, सपोआ म्हेत्रे, व पथक असे सदर शासकिय वाहनात बसलो व पो.नि. शिंदे यांनी वाहन चालकास सदर वाहन बांद्रा च्या दिशेने घेण्यास सांगितले. त्याप्रमाणे वाहन चालकाने सदर वाहन बांद्रा (पुर्व) येथे आणले असता, पो.नि. शिंदे यांनी जेड गार्डन आय विंग समोरील रोड क्रमांक ०७ समोरच्या बाजुस रस्त्याच्या कडेला सदर वाहन थांबविण्यास सांगितले. त्यानंतर पो.नि. शिंदे यांनी मला व पंचाना पडताळणी दरम्यान करावयाच्या दक्षतेबाबतच्या सुचना दिल्या. त्यानंतर पो.नि. शिंदे यांनी त्यांच्या ताब्यातील डिजीटल व्हाईस रेकॉर्ड काढून तो सुरू करून माझ्या शर्टाच्या आतील बनियानला लावला. त्यानंतर मी व पंच श्री. पठाडे पायी चालत लोकसेवकाच्या म्हाडा कार्यालय, बांद्रा येथील त्यांच्या कक्षात गेलो. सदर कार्यालयात गेल्यावर भुरे हे जेवण करण्याकरिता बाहेर गेले असल्याचे मला समजले. त्यामुळे श्री. भुरे व माझी प्रत्यक्ष भेट झाली नाही. त्यानंतर मी व पंच श्री. पठाडे श्री. भुरे यांच्या कार्यालयात काहीवेळ त्यांची वाट पाहत बसलो. परंतू श्री. भुरे हे त्यांच्या कार्यालयात लवकर न आल्याने मी व पंच श्री. पठाडे सदर कार्यालयातून निघुन शासकिय वाहन उभे असलेल्या ठिकाणी पायी चालत परत आलो. त्यांनतर पोनि शिंदे यांनी माझे बनियानला लावलेला रेकॉर्डर काढुन बंद केला.

त्यानंतर काही वेळानंतर मी माझा मोबाईल क्रमांक ७९७७९४९७३८ वरून भुरे यांचे प्युन रवी यांचा मोबाईल क्रमांक ९०८२२८५४०२ वर फोन करून भुरे हे कार्यालयात असलेबाबत खात्री केली. त्यानंतर पो.नि. शिंदे यांनी पुन्हा त्यांच्याकडील रेकॉर्डर काढला व चालु करून माझ्या शर्टच्या आतील बनियनला अडकविला. त्यानंतर मी व पंच श्री. पठाडे हे पुन्हा भुरे यांना भेटण्यासाठी पायी चालत म्हाडा कार्यालय, बांद्रा येथे गेलो असता माझी व श्री. भुरे यांची प्रत्यक्ष भेट झाली. सदर ठिकाणी गेल्यावर भुरे यांनी माझे सोबत आलेले पंच श्री पठाडे यांना बाहेर थांबण्यास सांगितले. सदरच्या भेटी दरम्यान मी माझे प्रलंबित बिलाबाबत भुरे यांना विचारणा केली असता भुरे यांनी माझेकडे दोन लाखाची मागणी करून त्यातील दीड लाख रू सोमवारी तेथे हजर असलेले उगले यांचेकडे देण्यास सांगितले तसेच बील मंजुर झाल्यानंतर पन्नास हजार रू मला देण्यास सांगितले. त्यानंतर मी पंच श्री पठाडे असे लोकसेवकाच्या कार्यालयातून निघुन शासकिय वाहन उभे असलेल्या ठिकाणी पायी चालत परत आलो. त्यानंतर पो.नि. शिंदे यांनी माझ्या शर्टाला लावलेला व्हाईस रेकार्ड काढून बंद करून स्वत:च्या ताब्यात घेतला व मला तसेच पंचाना लोकसेवकाच्या भेटी दरम्यान काय चर्चा झाली याबाबत विचारणा केली असता मी व पंच यांनी वर नमुद प्रमाणे माहिती सांगितली. त्यानंतर आम्ही सर्वजण लाप्रवि मुंबई कार्यालयात आलो व पुढील कार्यवाही केली.

दिनांक २६/१२/२०२२ रोजी म्हणजेच सोमवारी श्री भुरे यांनी बोलाविल्याप्रमाणे व त्यांच्या कार्यालयात लाचेची रक्कम घेवुन जायचे असल्याने मी लाप्रवि मुंबई कार्यालयात पोनि शिंदे यांचेसमक्ष हजर झालो. त्यानंतर मला श्री. भुरे हे त्यांच्या कार्यालयात उपस्थित नसुन ते रजेवर असल्याबाबत माहिती मिळाली. तसेच मला लाचेची रक्कम ही उगले यांचेकडे दयावयाची नसल्याबाबत मी पोनि शिंदे यांना सांगितले. त्यामुळे दिनांक २६/१२/२०२२ रोजी कोणतीही कारवाई करण्यात आली नाही.

त्यानंतर मला समजले की, श्री भुरे हे दिनांक ०३/०१/२०२३ रोजी त्यांच्या कार्यालयात येणार असलेबाबत माहिती मिळाली व सदरबाबत मी पोनि शिंदे यांना सांगुन मी ला.प्र.वि. कार्यालयात दिनांक ०३/०१/२०२३ रोजी ११.०० वाजण्याच्या सुमारास हजर राहिलो. पो.नि. अमोल शिंदे यांनी श्री.भुरे हे त्यांच्या

03/01/2023

Scanned with OKEN Scanner

कार्यालयात उपस्थित असल्याबाबत माझेकडुन खात्री करून घेतली. पो.नि.शिंदे यांनी लाच देण्याकरीता लागणारी रक्कम आणली आहे का? अशी माझेकडे विचारणा केली. त्यावेळी मी माझे व्यवसायातुन मिळालेल्या रक्कमेपैकी माझेकडे उपलब्ध असलेले रू. ५०,०००/– रक्कम सोबत आणली असल्याचे सांगितले. सदर वेळी मी माझेकडील रक्कम रु. ५०,०००/– (भारतीय चलनातील रु. ५००/– च्या १०० नोटा ) पो.नि. अमोल शिंदे यांचेकडे त्यांनी मागितल्यानुसार दिल्या तसेच त्यानंतर पोनि शिंदे यांनी उर्वरीत एक लाख रूपये बाबत विचारणा केली असता मी माझेकडे एक लाख रू नसल्याबाबत सांगितले. म्हणुन पोनि शिंदे यांनी १,००,०००/– रू च्या लहान मुलाच्या खेळण्यातील डमी नोटा आणुन त्या चलनी नोटांमध्ये एकत्रित करून एकुण दिड लाख वाटतील अशी रक्कम पंचासमक्ष तयार केली. त्यानंतर माझी पंचासमक्ष अंगझडती घेण्यात आली. पो.नि. अमोल शिंदे यांनी मी दिलेल्या सर्व भारतीय चलनी नोटांचे पोलीस अंमलदारांमार्फत कार्यालयातील झेरॉक्स मशिनवर फोटो काढले. दरम्यान मला पंचासमक्ष ॲथ्रसिन पावडरचे गुणधर्म समजावून सांगून अल्ट्रावायलेट लाईटचा वापर करून प्रत्याक्षिक करून दाखविले. मी दिलेल्या नमुद नोटांच्या आणि डमी नोटांच्या दोन्ही बाजूस ॲन्थ्रॉसिन पावडर लावून, सदर रक्कम एका सफेद लिफाफ्यात घालून सदर लिफाफ्याला बाहेरून ॲन्थ्रॉसिन पावडर लावून सदर लिफाफा माझे पॅन्टचे पुढच्या उजव्या खिशात ठेवला. त्यानंतर सापळापुर्व/सापळा कारवाई दरम्यान करावयाचे कारवाई बाबत पो.नि. अमोल शिंदे यांनी मला व पंचांना तसेच सापळा पथकातील अंमलदारांना सुचना दिल्या व कारवाईचे आयोजन केले. तसेच लोकसेवक श्री. भुरे यांनी लाचेची रक्कम स्विकारल्या नंतर सापळा पथकातील सर्व अधिकारी व अंमलदार यांना दिसेल अशा पध्दतीने माझ्या डावा हात डोक्यावरून वारंवार फिरवण्याचा इशारा करण्याबाबत सुचना दिली.

त्यानंतर पो.नि. शिंदे यांनी मला सापळा कारवाई दरम्यान घ्यावयाच्या दक्षतेच्या सुचना दिल्या व सापळा पुर्व कार्यवाही पुर्ण करून माझे तसेच पंच व स्वत:चे डिजीटल व्हाईस रेकॉर्डमध्ये वक्तव्य रेकॉर्ड केले आणि रेकॉर्डर पोनि शिंदे यांनी त्यांच्या ताब्यात ठेवला. त्यानंतर सापळा पथकातील अधिकारी व अंमलदार ला.प्र.वि. मुंबई कार्यालयाच्या आवारात जमा झाले. मी, पो.नि. शिंदे, सपोआ म्हेत्रे, पथक व पंच असे एका शासकीय वाहनात बसलो व उर्वरीत पथक दुसऱ्या शासकीय वाहनात आवश्यक त्या सर्व साधन सामुग्रीसह बसले.

त्यानंतर पो.नि. शिंदे यांच्या सुचनेनुसार दोन्ही शासकीय वाहने ही श्री भुरे यांच्या म्हाडा कार्यालय, बांद्रा येथे घेण्यास सांगितल्यावरून आम्ही शासकिय वाहनाने म्हाडा कार्यालयाजवळ येवुन थांबलो. त्यानंतर मला सापळा कारवाई दरम्यान घ्यावयाची दक्षतेबाबत सुचना दिल्या. तसेच लोकसेवक श्री. भुरे यांनी लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर माझ्या डावा हात वारंवार डोक्यावरून फिरवण्याचा इशारा पथकातील अंमलदारांना दिसेल अशा पध्दतीने करण्याच्या सुचना दिल्या. तसेच पंचाना सदर व्यवहार नजीक राहून पाहण्याबाबत सुचना दिल्या. त्यानंतर पो.नि. शिंदे यांनी त्यांच्या ताब्यातील डिजीटल व्हाईस रेकॉर्ड सुरू करून माझे शर्टच्या आतील बाजुस बनियानला लावला. त्यानंतर मी व पंच श्री. पठाडे असे पायी चालत लोकसेवक श्री. भुरे यांच्या म्हाडा कार्यालयात निघालो. आमच्या पाठोपाठ कोणाला संशय येणार यांनी अशा पध्दतीने सापळा पथकातील अधिकारी व अंमलदार पायी चालत निघाले. त्यानंतर मी श्री. भुरे यांच्या कक्षात गेलो व पंच श्री पठाडे हे श्री भुरे यांच्या केबिनच्या बाहेर थांबले. त्यानंतर मी भुरे यांचेबरोबर माझे प्रलंबित कामासंबधित चर्चा करीत असताना श्री भुरे यांनी मला हाताने इशारा करून **' कितना है '** अशी विचारणा केली त्यावर मी त्यांना **'देड'** असे सांगितले. त्यानंतर मी माझे पॅन्टच्या उजव्या खिश्यातील असलेली लाचेची रक्कमेचे पाकीट उजव्या हाताने बाहेर काढुन श्री भुरे यांच्या पुढे केले असता त्यांनी त्यांच्या उजव्या हाताने सदर लाचेची रक्कम स्विकारुन ते बसलेल्या टेबलच्या ड्रॉव्हरमध्ये ठेवली. त्यानंतर मी बाहेर येवून डावा हात डोक्यावर फिरवुण बाहेर उभ्या असलेल्या सापळा पथकातील अंमलदारांना दिसेल अशा पध्दतीने इशारा केला. त्यावेळी सदर ठिकाणी सर्व पथक हजर झाले व श्री भुरे यांना पंचासमक्ष टेबलच्या ड्रावर मधील लाचेच्या रक्कमेसहीत ताब्यात घेतले. त्यानंतर आम्ही सर्व पुढील कारवाई करण्याकरीता ला.प्र.वि. कार्यालय, वरळी, मुंबई येथे श्री भुरे यांचेसह कार्यालयात आलो.

Scanned with OKEN Scanner

माझा श्री. भुरे यांचेशी कोणताही वैयक्तिक आर्थीक देवाण–घेवाणीचा व्यवहार किंवा त्यांचेशी कोणतेही वैमनस्य नाही.

तरी श्री. आशिष भुरे, उप अभियंता, म्हाडा, मुंबई यांनी त्यांच्या पदाचा बेकायदेशीरपणे वापर करून, स्वतःच्या गैरफायदयाकरीता मी केलेल्या वर नमूदप्रमाणे कामाचे प्रलंबित बिलाची रक्कम मंजुर करण्याकरीता दिनांक २३/१२/२०२२ रोजी पंचासमक्ष केलेल्या पडताळणी कारवाई दरम्यान माझेकडे २ लाख (२,००,०००/–रू) लाचेची मागणी करून दिनांक ०३/०१/२०२३ रोजी पंचासमक्ष केलेल्या सापळा कारवाई दरम्यान माझेकडुन दीड लाख रू (१,५०,०००/– ) स्वीकारताना श्री भुरे यांना पोलीस पथकाने रंगेहाथ पकडले म्हणुन माझी श्री. आशिष भुरे, उप अभियंता, म्हाडा, मुंबई यांचे विरूध्द कायदेशीर तक्रार आहे.

माझा जबाब पो.नि. अमोल शिंदे यांनी संगणकावर मराठीत टंकलिखित केला असून, तो मी वाचून पाहिला तो माझे सांगणेप्रमाणे बरोबर आहे.

समक्ष,

03/01/2023

(अमोल शिंदे)
पोलीस निरिक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

Scanned with OKEN Scanner

5807

8\. तक्रारदाराने/फिर्यादीने तक्रार करण्याकरीता झालेल्या विलंबाची कारणे लोकी तक्रारीवरून, पडताळणी / सापळा कारवाई

Reasons for delay in reporting by the complainant/informant वरून तात्काळ.

9\. चोरीस गेलेल्या/अंतर्भुत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

—

10\. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भुत मालमत्तेचे एकूण मुल्य —

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11\. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक : —

Unnatural / Accidental Death Case No., if any

12\. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet. if required) : Detail write down back blank page.

यातील नमुद ता., वे व ठिकाणी यातील कॉ.क्र. ७ मधील नमुद आरोपी लोकसेवक यांनी त्यांच्या पदाचा बेकायदेशीरपणे वापर करून स्वतःच्या आर्थिक फायद्याकरीता यातील फिर्यादी यांचेकडे, फिर्यादी यांनी केलेल्या कामाचे बील मंजूर करण्याकरीता 2,00,000/- रु लाचेची मागणी करून फिर्यादीकडून सापळा कारवाई दरम्यान 1,50,000/- रु लाचेची रक्कम स्विकारताना आरोपी लोकसेवकास रंगेहाथ पकडण्यात आले म्हणून गुन्हा कलम ७ भ्र.प्र.आधि 1988 अन्वये गुन्हा नोंद.

13\. केलेली कार्यवाही :- 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :

अमोल शिंदे, पो.नि. लाप्रवि. मुंबई.

2\. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,

—

3\. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन —, जिल्हा —, राज्य —,

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.) .................. Rank.................. No. ............... to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to .................................................................. (3) Transferred to P.S ..................................................., District .............................. on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant/informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/ informant, free of cost.

(R.O.A.C.)

14\. तक्रारदाराची सही व अंगठा

Signature and Thumb impression of the Complainant / Informant.

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही. 03/01/2023

Signature of Officer In-charge, Police Station

संपूर्ण नाव Name अमोल बबन शिंदे.

पदनाम Rank पोलीस निरीक्षक

तपासिक अं. चा कोड. क्र.

Posting लाप्रवि. मुंबई.

Code No. of I. O. ..............................

15\. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख 04/01/2023

1\. Date and time of submitted to the Court.

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.

Copy to, 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of **First Information Report**

Resived F.I.R Copy on dated 3/01/2023

Scanned with OKEN Scanner